सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन

# शासकीय विधी महाविद्यालय

"ए" रोड, चर्चगेट, मुंबई -४०० ०२०.

दुरध्वनी क्र. ०२२-२२०४१७०७ | फॅक्स ०२२-२२०४१७०८

Website- www.glcmumbai.com | Email id- principal@glcmumbai.com

---

क्रमांक -शाविम/आस्था/२०२१-२२/1249 | दिनांक- 7/10/2021

## दरपत्रक सूचना

मा. प्राचार्य व खरेदी समिती, शासकीय विधी महाविद्यालय, मुंबई यांच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२१-२२, २०२२-२३ आणि २०२३-२४ या तीन वर्षांकरीता **महाविद्यालयातील अंदाजित प्रती वर्ष २००० इतक्या विद्यार्थ्यांचे छापिल माहितीसह ओळखपत्र बनविण्याकरीता** पात्र व अनुभवी पुरवठादार / उत्पादक यांच्याकडून दोन मोहोरबंद लिफाफ्यांमध्ये दरपत्रके मागविण्यात येत आहेत. दरपत्रकधारकांनी सदर यंत्रणेचे वर्णन (तांत्रिक व अतांत्रिक फॉर्म) या महाविद्यालयाच्या कार्यालयामधून उपलब्ध करुन घ्यावेत. याबाबतच्या अटी व शर्तींचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे :-

### अटी व शर्ती

**१.** दरपत्रकाचे फॉर्म (तांत्रिक व अतांत्रिक) भरुन शासकीय विधी महाविद्यालय, ए रोड, चर्चगेट, मुंबई- ४०० ०२० येथे महाविद्यालयाच्या ०२ ऱ्या मजल्यावरील कार्यालयामध्ये दि. २०/१०/२०२१ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत सादर करावेत. त्यांनतर आलेली दरपत्रके स्विकारण्यात येणार नाहीत.

**२.** मोहोरबंद लिफाफ्यांवर **"शासकीय विधी महाविद्यालय येथील विद्यार्थ्यांकरीता छापिल माहितीसह ओळखपत्रांचा पुरवठा करणे"** असे लिहिणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे, भाग-एक तांत्रिक व भाग- दोन अतांत्रिक असे दोन स्वतंत्र मोहोरबंद लिफाफे (दोन लिफाफा पध्दतीने) दरपत्रके सादर करावेत. अन्यथा दरपत्रक ग्राह्य धरण्यात येणार नाही.

**३.** दरपत्रक फॉर्मवर दरपत्रक धारकाची सही व शिक्का असणे बंधनकारक आहे.

**४.** दरपत्रकधारकाने दरपत्रकासोबत ओळखपत्राकरीता वापरण्यात येणाऱ्या PVC card, Plastic Holder, Ribbon इ. साहित्याचा नमुना सादर करावा.

**५.** मोहोरबंद लिफाफ्यावर E-mail id तसेच भ्रमणध्वनी / दुरध्वनी क्रमांक स्पष्टपणे नमूद करावा. दरपत्रकाचे मोहोरबंद लिफाफे उघडतेवळी दरपत्रकधारक स्वत: किंवा त्याचा एकच प्रतिनिधी उपस्थित राहू शकेल.

**६.** दरपत्रक सोबतच्या विहित फॉर्मसह दरपत्रकाचे रु. १५००/- (ना-परतावा) शुल्क महाविद्यालयाच्या कार्यालयामध्ये भरावे. व त्याची पावती दरपत्रकासोबत जोडावी.

**७.** ओळखपत्र व त्यावरील छपाई आकर्षक असावी. त्याचप्रमाणे ओळखपत्राच्या Ribbon वर महाविद्यालयाचा लोगो छापणे आवश्यक आहे. सदरच्या लोगोचा पुरवठा या महाविद्यालयाकडून केला जाईल.

८. ओळखपत्र तयार करण्याकरीता या महाविद्यालयाकडून पुरवठादारास विद्यार्थ्यांचा फोटो व Excel sheet मध्ये आवश्यक माहिती पुरविली जाईल. सदरच्या माहितीनुसारच ओळखपत्र बनविण्यात यावे. महाविद्यालयाने माहिती पुरविल्यानंतर तीन दिवसांमध्ये ओळखपत्र तयार करुन त्याचा पुरवठा या महाविद्यालयामध्ये करणे बंधनकारक आहे. त्याचप्रमाणे पुरवठादाराने महाविद्यालयाकडून पुरविलेल्या विद्यार्थ्यांच्या माहितीची गोपनियता पाळणे बंधनकारक आहे.

९. महाविद्यालयाने विद्यार्थ्यांची माहिती पाठविल्यानंतर ओळखपत्र त्वरीत तयार करुन त्यांची प्रिंट काढण्यापुर्वी ती Proof Reading करीता या महाविद्यालयास सादर करावीत. Proof Reading मध्ये आढळून आलेल्या चुका दुरुस्त करुन नंतर ओळखत्रांची प्रिंट काढावी. अन्यथा ओळखत्रांमध्ये होणाऱ्या चुकांना पुरवठादार सर्वस्वी जबाबदार राहील, याची नोंद घ्यावी.

१०. ओळखपत्रांचा पुरवठा केल्यानंतर १५ दिवसानंतर मुद्रांक पावतीसह देयके सादर करावीत. देयके प्राप्त झाल्यापासून ४५ दिवसांत देयक अदा करण्यात येईल. त्याकरीता महाविद्यालयाच्या कार्यालयामध्ये बँकेच्या खात्याचा तपशिल सादर करणे आवश्यक राहील. त्याचप्रमाणे सर्व परिपुर्ण माहितीसह देयके सादर करण्याची जबाबदारी पुरवठादाराची राहील. प्रशासकीय कारणास्तव देयक अदा करण्यास विलंब झाल्यास विलंब आकार किंवा व्याज देय राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

११. या महाविद्यालयाने दरपत्रक स्विकृत केल्यानंतर १५ दिवसांच्या आत रु. ५५००/- चा principal, Government Law College, Mumbai यांच्या नावे काढलेला डी. डी. सादर करावा.

१२. एका पुरवठादारास एकच दरपत्रक सादर करता येईल.

१३. कोणतेही एक अथवा सर्वच दरपत्रके नाकारण्याचा किंवा संपुर्ण प्रक्रिया पुर्णपणे किंवा दरपत्रक स्विकृतीच्या कोणत्याही टप्प्यावर कोणतेही कारण न देता थांबविण्याचा किंवा रद्द करण्याचा अधिकार प्राचार्य व खरेदी समिती, शासकीय विधी महाविद्यालय, मुंबई राखून ठेवत आहे.

१४. प्राप्त दरपत्रकांमधून पात्र पुरवठादाराची निवड संबंधित कामासाठी झाली व त्याने काही कारणास्तव कामाचे पुरवठा आदेश स्विकारण्यास नकार दिला तर त्यापुढील कार्यवाही करण्याचा अधिकार प्राचार्य व खरेदी समिती, शासकीय विधी महाविद्यालय, मुंबई राखून ठेवत आहेत.

१५. त्याचप्रमाणे दरपत्रकधारकाशी अनुबंध झाल्यानंतर त्याने आपले काम व्यवस्थितरीत्या न केल्यास सदर दरपत्रकधारकासोबतचा करार तात्काळ संपुष्टात आणण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

१६. दरपत्रकाचे फॉर्म शासकीय विधी महाविद्यालय, ए रोड, चर्चगेट, मुंबई च्या दुसऱ्या मजल्यावरील कार्यालयामध्ये दि. २०/१०/२०२१ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत मिळतील.

१७. दरपत्रके उघडण्याचा दिनांक व वेळ दरपत्रकधारकांना कळविण्यात येईल.

AAVaidya 07/10/21

डॉ. अस्मिता वैद्य.
प्राचार्य

दिनांक- 7/10/2021

शासकीय विधी महाविद्यालय
'ए' मार्ग, चर्चगेट, मुंबई - २०.